# प्रकरण ५ वे

# सारांश, निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरणामध्ये या अभ्यासाचा प्रत्येक प्रकरणानुसार थोडक्यात सारांश अभ्यासात आढळलेल्या एकूण माहितीवर आधारीत निष्कर्ष, शिफारशी आणि पुढील संशोधनासाठी काही विषय सुचविले आहेत. प्रस्तुत प्रकरणात खालील चार विभाग आहेत.

अ. संशोधनाचा प्रकरणानुसार सारांश

ब. निष्कर्ष

क. शिफारशी

ड. पुढील संशोधनासाठी विषय

## अ. संशोधनाचा प्रकरणानुसार सारांश :

### प्रकरण पहिले - प्रस्तावना

या प्रकरणामध्ये ग्रामीण पुनर्रचनेत शिक्षणाचे महत्त्व - भारत देशाची स्थिती त्यातील खेड्यांचे महत्त्व, अनौपचारिक शिक्षणाचे महत्त्व, शिक्षणात तंत्रविज्ञानाचा उपयोग, संशोधन गरज, संशोधनाचे विधान, संशोधनाचे महत्त्व त्यात अनौपचारिक शिक्षणातील विविध साधनांच्या परिणामकारकतेच्या चिकित्सक अभ्यासाची गरज, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहितके, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, संबंधीत

संशोधनाचा अभ्यास - त्यात ग्रामीण स्त्रियांच्या शिक्षणासंदर्भात झालेले संशोधन, ग्रामीण भागातील दूरदर्शनच्या कार्यक्रमासंबंधात झालेले संशोधन व शालेय कार्यक्रमातील दृक-श्राव्य साधनांची परिणामकारकतेचा चिकित्सक अभ्यास या संदर्भातील संशोधन अभ्यासाचा समावेश आहे.

## प्रकरण २ रे - शैक्षणिक तंत्रविज्ञान व ग्रामीण पुनर्रचना

या प्रकरणात शैक्षणिक तंत्रविज्ञानाचा अर्थ व महत्त्व त्यात शैक्षणिक तंत्रविज्ञानाच्या व्याख्या दृक-श्राव्य साधने त्यांचे वर्गीकरण ग्रामीण पुनर्रचनेची संकल्पना, ग्रामीण पुनर्रचना व ग्रामीण विकास यातील फरक ग्रामीण पुनर्रचनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी, ग्रामीण पुनर्रचनेची विविध क्षेत्रे, ग्रामीण पुनर्रचनेत तंत्रविज्ञानाचा उपयोग कसा करता येईल याचे विवेचन त्यात ग्रामीण पुनर्रचनेची कार्यक्रम कार्यवाहीसाठी निवडलेली क्षेत्रे, दृक-श्राव्य साधने, गटचर्चा, व्याख्याने, प्रत्यक्ष प्रयोग याचा अनौपचारिक शिक्षणाची परिणामकारकता वाढविण्यासाठी कसा उपयोग होईल याची चर्चा या मुद्दयांचा समावेश आहे.

## प्रकरण ३ रे - संशोधनाची कार्यपध्दती

या प्रकरणात संशोधनाची कार्यपध्दती विशद केली आहे. यात माहिती संकलन करण्यासाठी निवडलेली सर्वेक्षण पध्दती, संशोधनाची साधने, प्रश्नावली तयार करताना घेतलेली दक्षता, प्रश्नावलीतील विविध मुद्दे, गावातील १०० घरातील शेतमजूर, शेतकरी व कामगार अशा सर्व स्तरातील या दृच्छिक स्तरीय पध्दतीने निवडलेला १०% स्त्रियांचा प्रातिनिधीक नमुना गट, कार्यक्रमाची कार्यवाही करण्यासाठी जमविलेली साधने त्यांचे स्त्रोत, उपयोगात आणलेली साधने व पध्दती, कार्यक्रमपूर्व व कार्यक्रमोत्तर

देण्यासाठी तयार केलेल्या प्रश्नावल्या, त्यातील मुद्दे, कार्यक्रमातील अडचणी, माहिती संकलन, पृथ:करण, अहवाल लेखन याबाबत सविस्तर विवेचन केलेले आहे.

**प्रकरण ४ थे - संकलन आणि विशदिकरण**

या प्रकरणात संकलित माहितीचे पृथ:करण व विशदीकरण केलेले आहे. सुरूवातीला दृक-श्राव्य व लिखित सधनांची उपलब्धता नेमकी किती जणांकडे दूरदर्शनसंच आकाशवाणी व वृत्तपत्रे येतात त्यांचा उपयोग कशा तऱ्हेने केला जातो. तसेच स्वच्छतागृहांची उपलब्धता किती आहे . त्यावरून लोकांची त्यासंदर्भातील जागरूकता स्पष्ट केली आहे. तसेच आरोग्य त्यात स्त्रियांना स्वत:विषयीच्या आरोग्याची माहिती, बालसंगोपनाची जाणीव, स्वच्छतेच्या सवयीबाबतची जागरूकता अंधश्रध्देचे स्वरूप, बचतगट सहभाग, एकूण कार्यक्रम प्रतिसाद यासंबंधीची कोष्टके त्यात कार्यक्रमपूर्व व कार्यक्रमोत्तर प्रतिसाद त्यातील फरक व त्या अनुषंगाने माध्यमांची परिणामकारकता व त्यासंबंधी दिसणारे चित्र व त्याचे विशदीकरण याचा समावेश आहे.

**प्रकरण ५ वे - संशोधनाचा सारांश निष्कर्ष व शिफारशी**

या प्रकरणात संशोधनाचा प्रकरणानुसार थोडक्यात सारांश अभ्यासासाठी संकलित केलेले माहितीवर आधारीत उद्दिष्टानुसार निष्कर्ष संशोधनाच्या आधारे ग्रामीण पुनर्रचनेसाठी आवश्यक शिफारशी व भावी संशोधनाची क्षेत्रे याचा समावेश आहे.

**निष्कर्ष : दृक-श्राव्य साधनांची उपलब्धता :**

१. गटातील ४५% स्त्रियांकडेच (दृक-श्राव्य साधन) दूरदर्शन उपलब्ध आहे. अजुनही ग्रामीण भागात दूरदर्शनचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे त्या व्दारा होणारं लोकशिक्षण मर्यादीत आहे.

२. आकाशवाणीचे प्रमाण दूरदर्शनपेक्षा कमी म्हणजे २८% आहे म्हणजे आकाशवाणीची लोकप्रियता कमी होत आहे.

३. लोक आकाशवाणीपेक्षा दूरदर्शनला अधिक प्राधान्य देतांना दिसतात.

४. गावात वृत्तपत्रे स्वत: घेऊन वाचणाऱ्यांचे प्रमाण अतिशय कमी म्हणजे २२% आहे असे दिसून आले.

५. ज्यांच्याकडे दूरदर्शन आहे त्यांच्याकडेच वृत्तपत्रेही येतात असे दिसले.

६. कोणतेही दृक-श्राव्य व लिखित साधन नसणाऱ्यांची संख्याही २७% दिसून आली.

७. आर्थिक दृष्ट्या यातील कोणतेही साधन न परवडणारा वर्गही गावात आहे असे दिसून आले.

८. एकूण या सर्व माध्यमांचा विचार केला तर या सर्व माध्यमांच्या मदतीने जे अनौपचारिक शिक्षण होते त्यापासून ५०% जास्त लोक वंचित राहातात असे दिसले.

**दूरदर्शनचे कार्यक्रम - पाहाणाऱ्यांची संख्या :**

९. दूरदर्शनचा उपयोग मनोरंजनासाठी अधिक केला जातो असे दिसून आले ज्यांच्याकडे दूरदर्शन संच आहेत. त्यासर्वांनी मनोरंजनपर मालिका आवर्जून पाहातो असे सांगितले.

१०. दूरदर्शनवरील रामायण, महाभारत, श्रीकृष्ण यासारख्या धार्मिक-सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या मालिका १००% स्त्रिया पाहातात असे आढळले. या मालिका लोकप्रिय आहेत.

११. केवळ माहिती देणारे विविध विषयावरील कार्यक्रम लोकांना आकर्षित करीत नाहीत व त्याचे महत्त्व त्यांना वाटत नाही असे दिसून आले.

१२. शेतीवरील कार्यक्रमही गावात ठराविक लोकच पाहातात शेतीवरील कार्यक्रम पाहाणाऱ्यांची संख्या ही २८% आहे असे आढळून आले.

१३. कामगार व शेतमजूर स्त्रिया घर व बाहेरचे काम या दुहेरी ताणामुळे फुरसदीच्या काळातील मनोरंजनाचे साधन म्हणून दूरदर्शनचा उपयोग करतात असे दिसले.

**आरोग्य :**

१४. नमुना गटात शौचालयांची संख्या २२% आढळली.

१५. ग्रामीण भागासाठी शौचालयासाठी असलेल्या योजनेचा योग्य रितीने लाभ लोक घेत नाहीत.

१६. स्नानगृहांची गरज स्त्रियांना वाटते, त्यादृष्टीने व्यवस्था त्यांनी केली आहे असे ८०% स्त्रियांच्या प्रमाणावरून दिसले.

१७. शोषखड्डयांचे महत्त्व लोकांना समजलेले नाही हे फक्त १८% स्त्रियांकडेच ही व्यवस्था उपलब्ध होती यावरून दिसले.

१८. एकूणच आरोग्याचा विचार करता सार्वजनिक स्वच्छतेच्या सवयीचे प्रमाण कमी आढळते.

१९. याबाबत जागरूकता निर्माण करण्याची गरज आहे.

२०. प्रशासकीय लोकही व ग्रामपंचायतही याबाबत पुरेशा प्रमाणात प्रयत्नशील नाही हे ९ शौचालय वर्षभर पाण्याच्या सोयीच्या अभावी बंद असल्याची आढळून आली यावरून स्पष्ट दिसते. पाण्याची सोय करणे सहज शक्य असूनही दिरंगाई दिसली.

२१. याबाबत लोकांच्यामध्ये जागरूकता निर्माण करण्याची गरज आहे असे दिसून आले.

**आजारावरील उपाययोजना :**

२२. घरघुती उपचार करून शक्यतो बरे व्हावे असे म्हणणाऱ्या २८% स्त्रिया होत्या. गंभीर आजारात लवकर डॉक्टरांकडे जायला हवे याची जाणीव त्यांच्यात दिसली नाही.

२३. मांत्रिकावरील विश्वास २२% स्त्रियांनी व्यक्त केला परंतु कार्यक्रमोत्तर परिणामातून तो कमी झाल्याचे दिसले. यासाठी उपयोगात आणलेले चित्रफितीचे व प्रत्यक्ष चमत्काराचे प्रयोग व विश्लेषण हे कार्यक्रम परिणामकारक ठरले असे दिसते १२% आपले मत कार्यक्रमोत्तर बदलेले.

२४. एकूण वैद्यकीय मदत घेण्याचे गावातील प्रमाणही वाढत आहे ६०% लोकांनी याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला त्यावरून त्यावरून म्हणता येईल.

२५. कावीळ व सर्पदंश याबाबत अजुनही गावातील स्त्रियांच्यात गैरसमज आहेत असे दिसले.

२६. विविध गटचर्चा याबाबत उपयोगी पडतात असे कार्यक्रमोत्तर बदलावरून दिसते. कारण वैद्यकीय मदत घेण्याच्या संदर्भातील सकारात्मकता १४% ने वाढली.

**स्त्रियांची बालसंगोपनविषयक जाणीव :**

२७. गावातील लहान मुलांच्या लसीकरणाचे प्रमाण ८०% होते.

२८. गावातील लसीकरणाचे प्रमाण अंगणवाडी सेविका व आरोग्यसेविका यामुळे वाढले आहे. तरीही स्वयंजाणीवेने त्यात सहभागी होण्यासाठी प्रयत्नांची गरज आहे असे दिसले.

२९. याबाबत चित्रफिती व प्रदर्शने यांचा उपयोग झाला. १०% वाढ लसीकरणात आली.

३०. विविध दृक-श्राव्य साधने तक्ते याबाबतच्या शिक्षणात परिणामकारक ठरतात असे दिसून आले.

३१. स्वच्छतेच्या साध्या सवयी लावल्या जात नाहीत. नखे कापणे व दैनंदिन जीवनातील स्वच्छतेच्या सवयी जागरूकपणे लावणे याबाबत स्त्रिया उदासीन दिसल्या.

३२. गटचर्चा त्याही आरोग्य क्षेत्रातील अधिकारी व्यक्तींने केल्यास स्त्रियांच्यात याबाबत जागरूकता निर्माण होते. गट-चर्चा पध्दती उपयुक्त वाटली ३३% बदल हा लक्षणीय वाटला.

३३. सत्वयुक्त आहाराची जाणीव आहे असे ५५% स्त्रियांना सांगितले व आहाराबाबतही स्त्रियांच्यात कायक्रमोत्तर बदल ३२% दिसून आला.

३४. आहार, स्वच्छतेच्या सवयी याबाबत भारतीय शिक्षण संस्थेच्या चित्रफिती उपयुक्त ठरल्या.

३५. गटचर्चा, चित्रफिती, प्रदर्शने यातून स्वच्छतेविषयीची योग्य जाणीव निर्माण होते. ३३% कार्यक्रमोत्तर बदलातून हे स्पष्ट दिसून आले.

३६. वैद्यकीय अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन फलदायी ठरते असे दिसून आले.

३७. बालसंगोपनातील एकूणच आहार, स्वच्छता याचे महत्त्व आरोग्य चांगले राहाण्याच्या दृष्टीने सांगणे व त्यासाठी विविध माध्यमांचा उपयोग करणे परिणामकारक ठरते.

३८. स्त्रियांची स्वत: विषयीच्या आरोग्याची जाणीव. स्त्रियांना सर्वसाधारणपणे होणाऱ्या आजाराविषयी फक्त ३५% स्त्रियांना माहिती होती. यावरून आजारांची सर्वसाधारण माहिती घ्यावी म्हणजे योग्य वेळी दक्षता घेता येईल ही जाणीव स्त्रियांच्यात कमी दिसली.

३९. १३% स्त्रियांनी ही माहिती आपल्याला मिळाल्याचे कार्यक्रमोत्तर बदलातून सांगितले आहे. याबाबत 'आपण बायका' ही चित्रफित व स्त्री- आरोग्यावरील प्रदर्शन हे उपयुक्त ठरले.

४०. स्त्रियांना गरोदरपणात अधिक आहार घ्यावा लागतो. स्वत:च्या आहाराविषयीची माहिती फक्त ४७% स्त्रियांना होती. तज्ज्ञ डॉक्टरांशी चर्चा, चित्रफित (४५ मिनीटाची छोटी) व प्रदर्शने यातून आहाराविषयीची माहिती परिणामकारकरित्या देता येते.

४१. गावातील अंगणवाडी सेविका स्त्रियांना धनुर्वात लस देण्याचे कार्य करतात त्याचा परिणाम चांगला आहे असे आढळून आले. ७०% स्त्रिया धनुर्वाताची लस घेतलेल्या आढळल्या.

४२. आरोग्यसेविकांना त्यांच्या घरी जावून प्रत्येकवेळी माहिती द्यावी लागते.

४३. उत्स्फुर्तपणे व जागरूकपणे स्त्रिया लसीकरणाला जात नाहीत. याबाबतची जाणीव निर्माण करण्याची गरज आहे असे दिसून आले.

४४. शासकीय योजना सुविधा पुरविण्याचे कार्य करतात त्याबाबत जनजागरण करीत नाहीत.

४५. एड्स विषयी माहिती ग्रामीण स्त्रियांना नव्हती परंतु त्याबाबत माहिती करून घेण्याची उत्सुकता त्यांनी दाखविली याबाबतची भारतीय शिक्षण संस्थेने तयार केलेली चित्रफित 'सावट' ही उपयुक्त ठरली. ७०% स्त्रियांनी आपल्याला ही माहिती मिळाल्याचं कार्यक्रमोत्तर सांगितले.

४६. छोट्या ४५ मिनीटांच्या चित्रफितींचा उपयोग करून दखाद्या विषयाची समग्र माहिती देता येते. व्ही. सी. आरचा उपयोग करून चित्रफित दाखविली तर ते परिणामकारक ठरते असे दिसून आले.

४७. गटचर्चा आरोग्यविषयक माहिती देण्यास व्याख्यानापेक्षा अधिक उपयुक्त ठरतात व स्त्रिया स्वतःचे प्रश्न छोट्या गटात मांडतात असे दिसून आले.

४८. एकूण स्त्रियांना स्वतःच्या आरोग्याविषयी जागरूक करण्यासाठी अधिकारी व्यक्तीने केलेली चर्चा, चित्रफित उपयुक्त ठरली.

**अंधश्रध्दा :**

४९. देव अंगात येणे, भूत अंगात येणे याचे प्रमाण ग्रामीण स्त्रियांच्यात अनुक्रमे १५% ते १२% टक्के दिसून आले. कार्यक्रमोत्तर त्यात ६% ते २% बदल झालेला दिसून आला.

५०. मानसिक ताण-तणाव ज्या स्त्रियांना आहेत त्यात हे प्रमाण अधिक दिसले.

५१. व्रतवैकल्य व उपासतापास यावरच्या विश्वासाचे प्रमाणही स्त्रियांच्यात अधिक म्हणजे ७२% स्त्रियांच्या प्रतिसादातून दिसले. यासंदर्भातील कल्पना खोलवर सजलेल्या दिसतात त्यात चर्चेने फरक पडत नाहीअसे दिसून आले.

५२. देव-धर्माचा पगडा व त्यातून निर्माण झालेल्या पूजा-अर्चा-सत्यनारायण, श्राध्दविधी यावरच विश्वास ८०% स्त्रियांच्यात आहे. त्याबाबतही माध्यमांचा परिणाम होत नाहीअसे शून्य बदलातून दिसून आले.

५३. नवस बोलण्याचे प्रमाण ग्रामीण स्त्रियांच्यात ५५% म्हणजे बरेच आहे. त्या विश्वासातही फारसा बदल झालेला दिसला नाही.

५४. बुवाबाजी व चमत्कारावरचा विश्वास, मांत्रिक उपचार करतो किंवा रोग बरे करतो हा यात स्वरूपाचा ३०% लोकांच्यात दिसून आला व अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांचे प्रयोग व व्याख्यान यामुळे त्यात १९% टक्के ते २८% पर्यंत बदल कार्यक्रमोत्तर दिसून आला.

५५. अंधश्रध्देवरील प्रयोग हे ग्रामीण भागात उपयुक्त ठरतात असे दिसले.

५६. हे प्रयोग प्रत्यक्ष वस्तीवर जावून दाखविता येतात. त्याचा परिणाम अधिक चांगला होतो. हे प्रेक्षकांच्या प्रतिसादावरूनही दिसले.

५७. लोकांचे शोषण करणाऱ्या अंधश्रध्दा नाहीशा व्हाव्यात असे कोणतेही प्रयत्न ग्रामीण पातळीवर स्वयंसेवी संस्था करीत नाहीत असे दिसून आले.

५८. गावातील तरूण मुलांना यात सहभागी करून घेणे परिणामकारक ठरते. हे २८% बदलातून दिसून आले.

५९. अंधश्रध्देवरील चित्रफितही उपयुक्त ठरली. अंगात येणे यातील ६% बदल व करणीवरील विश्वासात झालेला ५% वदलातून हे दिसले.

६०. ग्रामीण स्त्रियातील प्रारब्धावरील विश्वासाचे प्रमाण ९५% आहे. त्यात बदल झाला नाही हे कार्यक्रमोत्तर प्रतिसादावरून दिसले.

६१. धर्म व ईश्वर विषयक अंधश्रध्दा खोलवर रूजलेले आहेत हे सत्यनारायणावरील विश्वास ८५% किंवा श्राध्दावरील विश्वास ६९% किंवा जपाची पुण्यप्रदता

मानणारा वर्ग ५५% होता यातून दिसून आले. या अंधश्रध्दा वरवरच्या उपायांनी नाहिशा होत नाहीत.

६२. अंधश्रध्देवर सातत्याने बराच काळ काम करणे गरजेचे आहे.

**स्वयंमदत गट :**

६३. ग्रामीण भागात भिशी गटाची कल्पना रूजलेली दिसली. ३५% स्त्रिया त्यात स्वयंस्फुर्तीने सहभागी झालेला होत्या.

६४. ग्रामीण भागातील स्त्रियांना अनेकींनी एकत्र येऊन पैसे एकत्रित केले तर उपयोगी पडतात. याची माहिती असते हे या ३५% भिशीगटात सामील असलेल्या स्त्रियांच्या संख्येवरून दिसले.

६५. बचत गटाचे काम अंगणवाडी सेविकांना दिलेले आहे परंतु त्या त्यात कमी पडतात असे दिसले. सुरूवातीचा १२% प्रतिसादावरून असे म्हणता येते. त्यासाठी आवश्यक अशा प्रशिक्षणाचा व प्रेरणेचा अभाव आढळून आला.

६६. बचत गटाचे महत्त्व पटवून दिल्यास ग्रामीण स्त्रिया त्याबद्दल उत्साह दाखवितात हे ४८% स्त्रियांच्या सहभागातून दिसले.

६७. आर्थिक प्रश्नांच्या अनुषंगाने स्त्रियांचे संघटन लवकर होते असे दिसून आले.

६८. सहकारातून विकास ही कल्पना रूजविण्याचे बचत गट एक प्रभावी माध्यम ठरते असे दिसून आले.

६९. बचत गटाची पुस्तिका कार्यकर्त्यांना उपयुक्त ठरली.

७०. बचत गटाचे महत्त्व नियोजनपुर्वक केलेल्या गटचर्चेतून स्त्रियांच्यापर्यंत प्रभावीपणे पोहचविता येते.

७१ संघटनेचे महत्त्व सांगणारी चित्रफितही त्यासाठी परिणामकारक ठरली.

**माध्यम व पध्दती-परिणामकारकता**

७२. ग्रामीण स्त्रियांना अनौपचारिक शिक्षण देण्यासाठी अपेक्षीत बदलाच्या दृष्टीने नियोजनपुर्वक माध्यम वापरली तर ती परिणामकारक ठरतात.हे कार्यक्रमोत्तर विविध घटकांतील बदलातून दिसून आले.

७३. गटचर्चेला ग्रामीण स्त्रियांचा प्रतिसाद ८५% मिळाला. गटचर्चा स्त्रियांना उपयुक्त वाटतात. छोट्या गटामुळे जिव्हाळा वाटतो व स्त्रिया उत्स्फु पर्तपणे आपल्या प्रश्नांचा विचार करू लागतात असे दिसते.

७४. व्याख्यान पध्दतीला स्त्रिया अनौपचारिक शिक्षणात कमीप्रतिसाद देतात असे ५०% प्रतिसादावरून दिसून आले.

७५. विशिष्ट विषयांवरिल माहीती नेमकेपणाने व प्रभावीपणे देण्यासाठी दृक-श्राव्य (४५-५० मिनिटाच्या) चित्रफि तो अधिक प्रभावी ठरल्या हे ७५% प्रतिसादावरून दिसून आले.

७६. ग्रामीण स्त्रियांना उपलब्ध होणारा फु रसदीचा वेळ कमी असल्यामुळे कमी वेळात अधिक माहिती देणाऱ्या व आकर्षकपणे त्यांच्याच भाषेत असलेल्या अशा चित्रफिती अधिक परिणामकारक ठरतात असे ७५% प्रतिसादावरून दिसले.

७७. प्रदर्शनाच्या दृक माध्यमाला स्त्रियांचा ७८% प्रतिसाद मिळाला. प्रदर्शनातूनही नेमकेपणाने माहीती दिली जाते व त्यामाध्यमातून स्त्रियांशी संवादही साधता येतो.

७८. चित्रप्रदर्शने साक्षर व निरक्षर दोन्ही स्त्रियांना उपयुक्त ठरली.

७९. चित्रप्रदर्शने पाहतांना चित्राच्या खालचा मजकूर निरक्षर स्त्रियांना वाचून दाखविला की समजेल असा असणे गरजेचे असते. हे पुण्यातील साद गटाने

केलेल्या प्रदर्शनातील बातम्यांचे संदर्भ वृत्तपत्रे वाचन नसल्याने स्त्रियांना समजले नाहीत. अनेक चालू घडामोडींचे ज्ञानही ग्रामीण स्त्रियांना नाही. त्यामुळे ग्रामीण भागात साधने बनविताना त्यांना समजतील अशीच असणे गरजेचे आहे असे दिसून आले.

८०. अंधश्रध्देवरील प्रत्यक्ष प्रयोग अधिक उपयुक्त ठरले. तसेच प्रत्यक्ष प्रयोगाची चित्रफितही परिणामकारक ठरली.

८१. प्रत्यक्ष लोकवस्तीत जावून प्रयोग दाखविल्यास त्यात अधिक संख्येने म्हणजे ७०% लोक सामिल झाले.

८२. मोठ्या कालावधीच्या चित्रपटीकेपेक्षा नेमक्या विषयावरच्या ४५-५० मिनिटाच्या चित्रफिती व्ही. सी. आर. च्या साहाय्याने दाखविल्या तेंव्हा स्त्रियांचा प्रतिसाद अधिक म्हणजे ७५% मिळाला.

८३. गावात धार्मिक कार्यक्रम भजन, कीर्तन, पारायणे यासारखे कार्यक्रम अधिक प्रमाणात होतात असे दिसले.

८४. अंधश्रधदा कमी व्हाव्यात, आरोग्य सुधारावे किंवा वैचारिक बदल व्हावेत यादृष्टीने प्रबोधनात्मक कार्यक्रम गावपातळीवर फारच कमी होतात असे दिसून आले.

८५. गावात प्रबोधनात्मक कार्यक्रमाची अधिक गरज आहे.

८६. भारतीय शिक्षण संस्थेने अनौपचारिक शिक्षणासाठी तयार केलेल्या चित्रफिती या गावात अतिशय उपयुक्त ठरल्या.

८७. भारतीय शिक्षण संस्थेची प्रौढ शिक्षणासाठी तयार केलेली आरोग्य शिक्षणावरील पुस्तके व तक्ते हे उपयुक्त ठरले. स्वच्छतेच्या सवयी व आहार यांच्यातील २०% सकारात्मक प्रतिसादातून दिसले.

८८. गावाजवळील शहरातील विविध स्वयंसेवी संस्थांची मदत घेऊन व्याख्याने, गटचर्चा ठेवणे, ग्रामीण पुनर्रचनेच्या दृष्टीने उपयुक्त ठरले. हे विविध घटकात झालेल्या बदलावरून म्हणता येते.

**शिफारशी व सूचना :**

सुरूवातीला गावाची केलेली प्रारंभिक पाहणी व कार्यक्रमाची कार्यवाही आणि कार्यक्रमोत्तर निष्कर्ष लक्षात घेता ग्रामीण पुनर्रचनेत शैक्षणिक तंत्रविज्ञानाच्या परिणामकारकतेचा अभ्यास केल्यानंतर खालील मार्गदर्शक सूचना केलेल्या आहेत.

१. दृक-श्राव्य उपलब्धता गावात कमी असते. ग्रामपंचायतीने दूरदर्शन संचाचा अधिकाधिक उपयोग लोकशिक्षणासाठी जाणीवपूर्वक करावा.

२. गावात वर्तमानपत्रे व वैयक्तिक रित्या कमी लोक घेतात म्हणून गावात सार्वजनिक वाचनालय स्वयंसेवी संस्थांनी व पंचायतीने सुरू करावे व लोकांना वृत्तपत्रे, ग्रंथ उपलब्ध करून दयावेत.

३. दूरदर्शन व आकाशवाणी याचे माहिती व ज्ञान देणारे कार्यक्रम लोकांनी पाहण्यासाठी त्याबद्दल जागृती करण्याचा प्रयत्नही कार्यकर्त्यांनी केला पाहिजे. लोकशिक्षणाच्या दूरदर्शनच्या कार्यक्रमावर गटचर्चा, व्याख्याने ठेवून त्याबद्दल आकर्षण निर्माण केल्यास गावातील त्याची परिणामकारकता वाढेल.

४. शौचालये, शोषखड्डे यासंदर्भातील शासकीय योजनांची माहिती लोकांच्यापर्यंत पोहचविणे व त्यासाठी कार्यक्रम आखून नियोजनबध्दरितीने चर्चा, प्रात्यक्षिके ठेवून त्याबद्दल जागती करावी.

५. आरोग्याच्या संदर्भात सुविधा पुरविण्याबरोबर आरोग्याचे रक्षण करण्यावर भर देणे गरजेचे आहे. त्यासाठी तक्ते, प्रदर्शने याचा उपयोग केला पाहिजे.

६. अंधश्रध्दा निर्मूलनाचे प्रयत्न गावपातळीवर सातत्याने होणे गरजेचे आहे. त्यासाठी अंधश्रध्देचे प्रत्यक्ष प्रयोग व विश्लेषण असे कार्यक्रम घेतले जावेत.

७. अंधश्रध्देवरील कार्यक्रम हे वस्तीमध्ये जाऊन घ्यावेत.

८. अंधश्रध्देवरील प्रयोगात गावातील तरूण कार्यकर्त्यांना सामील करून घेऊ न प्रयोग करावेत.

९. अंधश्रधदेवरील प्रयोगाबरोबरच त्यावरील चर्चा, व्याख्याने ठेवावीत.

१०. जेथे प्रयोग दाखविणे शक्य नाही तेथे व्ही. सी. आर चा वापर क रून प्रयोगाच्या चित्रफिती दाखवाव्यात.

११. गावात कार्यकर्ते तयार करण्यावर स्वयंसेवी संस्थांनी भर दयावा.

१२. रूढी परपरेच्या पगड्यामुळे स्त्रिया स्वत:कडे दुर्लक्ष करतात. स्त्रियांना आजाराविषयी सर्वसामान्य माहिती अधिकारी व्यक्ती मार्फ त दयावी. त्यासाठी गटचर्चेचा उपयोग करावा.

१३. स्त्री हा कुटुंबातील महत्त्वाचा घटक दुर्लक्षणीय आहे. त्याकडे लक्ष देऊ न आरोग्य, आहार, लसीकरण याबाबत त्यांना जागरूक करावे. त्यासाठी शासनाच्या आरोग्य विभागाने विविध चित्रपटीका, चित्रफि ती व प्रदर्शने तयार करावीत.

१४. शासनाने आरोग्य शिक्षणासाठी ४५-५० मिनीटांच्या प्रभावी चित्रफि ती तयार कराव्यात व त्याचा उपयोग करून पंचायती मार्फत आरोग्य शिक्षणाचे कार्यक्रम राबवावेत.

१५. आरोग्यसेविकांना ग्रामीण भागात अनौपचारिक आरोग्य शिक्षण कसे देता येईल याचे प्रशिक्षण दयावे.

१६. आरोग्यसेविकांना आरोग्य रक्षणाचे शिक्षण गावात देण्यासाठी विविध प्रदर्शने, तक्ते हे सातत्याने द्यावेत, त्यात नवनवीन ज्ञानाची भर घालावी. त्यात विविधता, आकर्षकता असावी.

१७. एड्सबाबत ग्रामीण भागात माहिती दयावी. त्यासाठी चित्रफि तींचा उपयोग करावा.

१८. एकात्मिक ग्रामविकासांतर्गत गावात ज्या अंगणवाडी सेविका आहेत त्यांना पुरेसे प्रशिक्षण अनौपचारिक शिक्षणाच्या दृष्टीने दयावे.

१९. माता व बालसंगोपन याबाबतची नवनवी आकर्षक प्रदर्शने तक्ते अंगणवाडी सेविकांनाही पुरवावेत. विविध चित्रफितींचा उपयोग करण्यासाठी त्यांना प्रशिक्षण दयावे.

२०. दैनदिन जीवनातील वैयक्तिक स्वच्छता याबाबतच महत्त्वपटवून देण्यावर आरोग्यकेंद्राचा भर हवा व त्यासाठी विविध दृक-साधने व दृक-श्राव्य चित्रफि ती अशी साधने शासनाने पुरवावित. त्यासाठी व्ही. सी. आरची सुविधाही ग्रामपंचायतींना दयावी.

२१. अंगणवाडीतून बालकांना पोषक आहार दिला जातो परंतु कोणत्या वयात मुलांना कोणता आहार दयावा. आहार देतांना त्यांची पोषकता मूल्य कसे राखावे याबाबत ज्ञान मात्र मातांना दिले जात नाही. त्यावरही अंगणवाडीत कार्यक्रम असावेत.

२२. बचत गटाचे माध्यम ग्रामीण लोकांना संघटित करण्याचे प्रभावी साधन आहे. ग्रामीण भागात याबाबत अधिक प्रसार करण्याची गरज आहे.

२३. शासन व स्वयंसेवी संस्था यांनी संयुक्तरित्या बचत गटाचे कार्य करावे व त्यासाठी गटचर्चाही पध्दती वापरावी. तसेच त्यावरील ध्वनीफि त व चित्रफि त

पंचायतींना उपलब्ध करून दयावी. स्त्रियांना सबलता प्राप्त करून देण्याचे प्रभावी साधन 'बचत गट' आहे. अंगणवाडी सेविकांना बचत कसे निर्माण करावेत याबाबत योग्य प्रशिक्षण शासनाने द्यावे.

**माध्यमांच्या उपयोगाबाबत सूचना :**

१. ग्रामीण पुनर्रचनेच्या दृष्टीने अनौपचारिक शिक्षणात तंत्रविज्ञानाचा उपयोग करावा.

२. केवळ एकच एक तंत्र किंवा साधन वापरू नये तर विविध साधनांचा उपयोग करावा.

३. आरोग्याच्या शिक्षणासाठी चित्रफिती, प्रदर्शने, तक्ते यांचा उपयोग करावा.

४. लोकांना संघटित होण्याची प्रेरणा देण्यासाठी व्याख्याने, गटचर्चा यांचा उपयोग करावा.

५. ठराविक पध्दती किंवा साधनेच प्रत्येक ठिकाणी परिणामकारक ठरतील असे नाही. गावाची रचना, सामाजिक स्थिती लक्षात घेऊन नियोजनबध्द रितीने साधनांचा उपयोग करावा.

६. गावाच्या जवळील शहरातील विविध स्वयंसेवी संस्था, मेडीकल असोसिएशन, महिला मंडळे, रोटरी व लायन्स क्लबसारख्या संस्था यांच्या मदतीने ग्रामीण पुनर्रचनेचे कार्य अधिक सुकर होते. ग्रामपंचायतीने हा समन्वय साधावा.

७. ग्रामपंचायतीने ग्रामसभेचे आयोजन नियमितपणे केले पाहिजे. ग्रामविकासाचा आराखडा ठरवून विकासाचे अग्रक्रम ठरवून लोकांना सहभागी करून कार्य करावे. गटचर्चा, व्याख्याने याचा उपयोग करावा.

८. गावातील विकास योजनांचे महत्त्व लोकांना समजावून देण्यासाठी व लोकांचा सहभाग मिळविण्यासाठी प्रेरणा देणारे चित्रपट, छोट्या चित्रफिती यांचा उपयोग करावा.

९. गावातील कार्यक्रम ठरवितांना व माध्यमांचा उपयोग करताना गावातील लोकांचे सणवार, कामातून मिळणाऱ्या फु रसदीचा काळ पाहून कार्यक्रमाचे नियोजन करावे.

१०. गावाबाहेर कार्यक्रम घेण्याऐवजी गावाच्या समूहाच्या वस्तीतच अधिक कार्यक्रम घ्यावेत.

११. ग्रामीण पुनर्रचनेत स्त्रियांचा सहभाग महत्त्वाचा मानून त्याकडे दूर्लक्ष न करता अनौपचारिक शिक्षणाचे प्रयत्न स्वयंसेवी संस्थांनी करावेत. त्यासाठी चित्रफित, प्रदर्शने यांचा उपयोग करावा.

१२. ग्रामीण स्वच्छतेच्या दृष्टीने शौचालये, शोषखड्डे याबाबत लोकांना प्रोत्साहन दयावे. त्यासाठी गटचर्चा आयोजित कराव्यात.

१३. अंधश्रध्दा निर्मूलनासाठी प्रत्यक्ष प्रयोगाचा व विश्लेषण याचा उपयोग करून लोकशिक्षण करावे.

१४. ग्रामपंचायतीतील दूरदर्शन संचाचे शेती, आरोग्य माहिती देणारे कार्यक्रम लोकांना दाखवावेत. ते पाहण्यासाठी प्रोत्साहन दयावे.

## पुढील संशोधनासाठी विषय :

ग्रामीण भागातील अनौपचारिक शिक्षणातील तंत्रविज्ञानाच्या वापराबाबत फारच थोडे संशोधन झाले आहे. त्यावर अधिक संशोधन होण्याची गरज आहे. त्यासाठी पुढील विषय संशोधनासाठी सुचवता येतील.

१. आकाशवाणी व दूरदर्शनवरील आरोग्यविषयक कार्यक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास.

२. आरोग्यविषयक शासकीय माहिती देणारे कार्यक्रम - त्यातील विविध साधनाच्या परिणामकारकतेचा अभ्यास.

३. ग्रामीण एकात्मिक योजनेतील माता-बाल संगोपन कार्यक्रमांचा मूल्यमापनात्मक अभ्यास.

४. ग्रामपंचायतीची विकासात्मक कामे त्यातील लोकसहभाग याचा चिकित्सक अभ्यास

५. अनौपचारिक शिक्षण देणाऱ्या चित्रफितींच्या परिणामकारकतेचा चिकित्सक अभ्यास.

Write the bibliography as per APA style of writing reference. Use standard Research format.

**संदर्भ सूचि :**


१. बापट, भा. गो. — <u>शैक्षणिक संशोधन</u>
पुणे : नूतन प्रकाशन, १९७५. २०२ पृ. पृ.

२. बूच, एम्. बी. — <u>फोर्थ सर्व्हे ऑफ रिसर्च इन् एज्युकेशन</u> १९८३-८८
न्यू दिल्ली : पब्लीकेशन डिपार्टमेंट
एन. सी. ई. आर. टी., १९९१. ७८२ पृ. पृ.

३. बोबे, बा. सं. — प्रौढ शिक्षण, अनौपचारीक शिक्षण व निरंतर शिक्षण
पुणे : नूतन प्रकाशन, ११०. २३ पृ. पृ.

४. चुनखडे, ना. ए. — <u>ग्रामीण समाज शास्त्र</u>
पाटील, वि. भा. — कोल्हापूर : फडके प्रकाशन, १९९०. ११५ पृ. पृ.

५. दाभोळकर, नरेंद्र — <u>भ्रम आणि निरास</u>
पुणे : राजहंस प्रकाशन, १९८६. ६ पृ. पृ.

६. दांडेकर, बा. ना. — <u>शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र</u>
पुणे : श्री विद्या प्रकाशन, १९७४. ८५ पृ. पृ.

७. जगताप, ह. ना. — <u>शैक्षणिक तंत्रविज्ञान</u>
पुणे : नूतन प्रकाशन, १९९१. ११ पृ. पृ.

८. जगताप, ह. ना. — <u>प्रगत शैक्षणिक तंत्रविज्ञान</u>
पुणे : नूतन प्रकाशन, १९९१. ९ पृ. पृ.

९. कर्णिक, वा. भा. — <u>ग्रामीण पुनर्रचना व शिक्षण</u>
गोखले, मधूसूदन — पुणे : श्री विद्या प्रकाशन, १९८४. ५ पृ. पृ.

१०. कानडे, अ. गो. — भारतीय आरोग्य सेवा - शिक्षण व समाज
पुणे : इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ एज्यूकेशन,
डिसेंबर १९८८. ३५ पृ. पृ.

११. कुलकर्णी, एस्. एस्. — एज्यूकेशनल टेक्नॉलॉजी इयर बुक
न्यू दिल्ली : ऑल इंडिया असोसिएशन फॉर
एज्यूकेशन टेक्नॉलॉजी, १९८९. २ पृ. पृ.

१२. केसरी, वि. दा. — समाज विज्ञान कोष
पुणे : समाज विज्ञान मंडळ, १९८७. ३९९ पृ. पृ.

१३. मुळे, रा. श.
उमाठे, वि. तु. — शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे
नागपूर : साहित्य प्रसार केंद्र, १९७७. २०२ पृ. पृ.

१४. नाडगौडे, गु. द. — ग्रामीण समाजशास्त्र
पुणे : कॉन्टीनेन्टल प्रकाशन, १९७६. १८७ पृ. पृ.

१५. ओक, सुमन — शैक्षणिक तंत्रविज्ञान
पुणे : श्री. विद्या प्रकाशन, १९८४. १५ पृ. पृ.

१६. पारसनीस, न. रा. — शिक्षकांचे प्रशिक्षण
पुणे : नूतन प्रकाशन, १९९३. १५५ पृ. पृ.

१७. राव, उषा — शैक्षणिक तंत्रविज्ञान
नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ,
१९७५. १ पृ पृ.

| | |
|---|---|
| १८. संपत, के. | <u>इन्ट्रोडक्शन टू एज्यूकेशनल टेकनॉलॉजी</u> |
| पनीर सेल्व्हम | न्यू दिल्ली : स्टर्लींग पब्लीशर्स प्रा. लि., |
| | १९८४.१६ पृ. पृ. |
| १९. शेटे, शा. शं. | <u>शालेय संशोधन प्रकल्प</u> |
| केसकर पु. दि. | कोल्हापूर : महाराष्ट्र ग्रंथ भांडार, १९७२. २२ पृ. पृ. |
| २०. शर्मा, मंजू | <u>ग्रामीण विकासासाठी विज्ञान, तंत्रज्ञान</u> |
| | मुंबई : योजना गणतंत्र विशेषांक |
| | माहिती व प्रसारण मंत्रालय, १९९१. ६० पृ. पृ. |
| २१. सोनार, मधूकर | <u>दृक-श्राव्य शिक्षण साहित्य - तंत्र व पध्दती</u> |
| | पुणे : गो. य. राणे प्रकाशन १९७०. १६ पृ. पृ. |

## परिशिष्ट - अ

प्रेषक

प्रा. मंगला गोपाळ नारकर
संशोधन अधिछात्र
श्रीरामपूर.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर एम्. फिल. संशोधन कार्य.

विषय : ''शैक्षणिक तंत्रविज्ञानाचा ग्रामीण पुनर्रचनेवर होणाऱ्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास''.

महोदय / महोदया,

आपल्या गावामध्ये मी संशोधन कार्य करावयाचे ठरविले आहे. आपल्या गावातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक परिस्थितीचा परिचय व्हावा तसेच एकूण गावात कोणते उपक्रम राबविले जातात? कोणत्या संस्था आहेत? गावातील विकासाचे काम कसे चालते त्यासाठी कोणती साधने उपयोगात आणली जातात? यासंदर्भातील माहिती मी जाणून घेऊ इच्छिते. गावविकासाच्या कामात तुमच्याबरोबर मला काही काम करता आले तर आनंदच वाटेल. त्यादृष्टिनेही मला माहितीची गरज आहे. आपल्या सहकार्यावर माझे संशोधन कार्य अवलंबून आहे तरी कृपया माहिती मिळविण्याच्या दृष्टिने तयार केलेली प्रश्नावली भरून द्यावी ही विनंती.

आपली विश्वासू,

(मंगला गोपाळ नारकर)

## परिशिष्ट - ब

**प्रश्नावली भरण्यासंबंधी सूचना**

१. ही प्रश्नावली आपण स्वत:च किंवा आपल्या घरातील व्यक्तींनी भरावी.

२. घरात साक्षर कोणी नसल्यास शेजारील व्यक्तीकडून भरून घ्या परंतु उत्तरे तुमची स्वत:ची असावीत.

३. प्रश्नावलीतील माहितीचा उपयोग तुमच्या नावाचा उल्लेख न करता केला जाईल म्हणून माहिती नि:संकोचपणे भरावी. त्याचा संशोधनातील निष्कर्ष काढण्यास उपयोग होणार आहे.

४. प्रश्नांच्या सुरूवातीला उत्तर कसे द्यावयाचे यासंबंधी सूचना दिलेल्या आहेत. त्याचा उपयोग करून प्रश्नावली भरावी.

५. एखादया प्रश्नाचे उत्तर वेगळे द्यावयाचे असल्यास वेगळा कागद जोडून त्यावर प्रश्न क्रमांक व पृष्ठ क्रमांक देवून उत्तर लिहावे.

गावाची सामाजिक आर्थिक आरोग्यविषयक पाहणी.

**- शिरसगाव -**

ता. श्रीरामपूर जि. अहमदनगर.

१. कुटुंबप्रमुखाचे नाव : -------------------------------------- वय -----

व्यवसाय ---------------------- कुटुंबातील एकुण सदस्य संख्या ------------

२. खालील प्रश्नांची उत्तरे देताना ज्या प्रश्नाचे उत्तर होय असेल तेथे चौकटीत अशी खूण करा. उत्तर नाही असल्यास नाही असा स्पष्ट उल्लेख करा.

साक्षरता -संख्या लिहा - साक्षर पुरूष स्त्री ☐ मुले ☐

निरक्षर पुरूष स्त्री ☐ मुले ☐

३. शाळेत जाणारी मुले / मुली संख्या लिहा - मुले ☐ मुली ☐

मुले शाळेत जात नसल्यास कारण - घरकाम ☐ आजारपण ☐

दुर्लक्ष ☐ आर्थिक असहायता ☐ अन्य ☐

चौकटीत होय असल्यास ☐ अशी खूण करा. नाही असल्यास त्यासमोरील चौकटीत नाही पुढे अशी खूण करा.

घरात खालीलपैकी कोणती साधने आहेत?

१. आकाशवाणी / रेडिओ ☐ दूरदर्शन ☐

रेडिओवरील कोणते कार्यक्रम ऐकता? - मनोरंजनाचे ☐

महिलासाठीचे ☐ शेती ☐ आरोग्य माहिती देणारे ☐

दूरदर्शनवरील कोणते कार्यक्रम पाहता? मनोरंजनपर मालिका / चित्रपट ☐

धार्मिक मालिका ☐ शेतीवरील कार्यक्रम ☐

विविध विषयावरील माहिती व ज्ञान देणारे ☐

प्रदर्शने पाहिली आहेत का ? होय ☐ नाही ☐

होय असल्यास कोणत्या विषयावरील?

वृत्तपत्रे वाचता का ? होय ☐ नाही ☐

वाचत असल्यास कोणती ? नावे लिहा. ____________________

मासिके वाचता का ? होय ☐ नाही ☐

वाचत असल्यास कोणती ? नाव लिहा. ____________________

**आर्थिक -** चौकटीसमोर नावे लिहा व प्रतिसाद होय असल्यास होय समोर अशी खूण करा.

कुटुंबाच्या उपजिवीकेचे मुख्य साधन ☐ दुय्यम साधन ☐

व्यवसायात / शेतीत सहभाग पुरूष ☐ स्त्रिया ☐ मुले ☐

कुटुंबाचा खर्च भागतो का ? होय ☐ नाही ☐

प्रमुख साधनापासून उत्पन्न वार्षिक अंदाजे ☐ संख्या लिहा.

कर्ज काढले आहे का? होय ☐ नाही. ☐

असल्यास कोठून ? पतपेढी ☐ शासकीय ☐

बँक नातेवाईक / शेजारी ☐

**आरोग्य** - चौकटीत होय असल्यास खूण करा.

वर्षभरात घरातील व्यक्तींना झालेला आजार ................

स्वरूप लिहा......................................

औषधोपचाराची योजना ..........................

घरात १ वर्षाआतील लहान मुले किती? संख्या लिहा ☐

लस टोचली आहे का? ट्रिपल ☐ पोलिओ ☐ गोवर ☐

बी.सी.जी ☐ अन्य ☐

शौचालयाची सुविधा आहे का? होय ☐ नाही ☐

सार्वजनिक ☐ स्वतंत्र ☐

स्नानाची स्वतंत्र व्यवस्था आहे का? मोरी ☐ बंद स्नानगृह ☐ नाही ☐

सांडपाण्याची व्यवस्था लावली आहे का? होय ☐ नाही ☐

असल्यास कोणती?

शोषखड्डयाची माहिती आहे का? होय ☐ नाही ☐

पिण्याचे पाणी कोठून मिळते ? नळ ☐ तलाव ☐ विहीर ☐

पाणी शुध्द / स्वच्छ करता का? कसे गाळणे ☐ उकळणे ☐ अन्य ☐

गुरे कोठे बांधता? गोठ्यात ☐ दारात ☐

खताचे खड्डे आहेत का? होय ☐ नाही. ☐

घराभोवतालचा परिसर स्वच्छतेच्या दृष्टीने कसा बरा ☐ चांगला ☐

अस्वच्छ ☐

घरात जळणारी व्यवस्था - गॅस ☐ निर्धुर चूल ☐ साधी चूल ☐

स्टोव्ह ☐

सामाजिक - कोणत्या सामाजिक संस्थेचे सभासदत्व आहे ?

नावे लिहा - १. २.

गावातील कोणत्या सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी होता?

कार्यक्रमाचे स्वरूप भजन ☐ किर्तन / पारायणे ☐

सामाजिक प्रबोधनपर ☐ व्याख्याने ☐ चर्चा ☐

कोणत्या मंडळात सहभाग

महिला मंडळ ☐ युवक संघटना ☐ अन्य ☐

महिला मंडळ / युवक मंडळ - होय असल्यास - कोणते उपक्रम होतात

धार्मिक ☐ सामाजिक ☐ अन्य ☐

आहार - पोषक आहाराची माहिती आहे का? होय ☐ नाही ☐

रोजच्या जेवणात कोणते पदार्थ घेता?

भात ☐ भाजी ☐ पोळी ☐ भाकरी ☐

गावात कोणती कामे व्हावीत असे वाटते ?

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

## परिशिष्ट - क

प्रेषक

प्रा. मंगला गोपाळ नारकर
संशोधन अधिछात्र
श्रीरामपूर.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर एम्. फिल. संशोधन कार्य.

विषय : ''शैक्षणिक तंत्रविज्ञानाचा ग्रामीण पुनर्रचनेवर होणाऱ्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास''.

महोदय / महोदया,

आपल्या गावातील गावठाणातील स्त्रियांच्या गटात मी संशोधन कार्य करावयाचे ठरविले आहे. आपल्या सहकार्याची मला गरज आहे. सोबत मी तीन विषयावर प्रश्नावल्या दिल्या आहेत. संशोधन कार्यासाठी आवश्यक माहिती म्हणून आपली मते अंधश्रध्दाविषयक आरोग्यविषयक, आर्थिक संघटना करण्याच्या दृष्टीने मला जाणून घ्यायची आहेत. या माहितीचा उपयोग केवळ संशोधनासाठीच केला जाईल असे मी अभिवचन देत आहे.

आपल्या सहकार्यावरच संशोधन अवलंबून आहे तरी कृपया प्रश्नावली काळजीपूर्वक भरावी ही विनंती.

आपली विश्वासू,

(प्रा. मंगला गोपाळ नारकर)

## परिशिष्ट - ह

### प्रश्नावली अंधश्रध्दाविषयक

नाव : ------------------------------------------ वय ---------------

व्यवसाय --------------------- शिक्षण ----------------------

सूचना : ज्या प्रश्नाचे उत्तर होय असेल त्या समोरील चौकोनात खूण करा.

प्रश्न १. अंधश्रध्देविषयी माहिती मिळाली आहे का? होय ☐ नाही ☐

कोठून ?

| | |
|---|---|
| १. व्याख्यान ☐ | २. सामाजिक कार्यकर्ते ☐ |
| ३. वृत्तपत्रे ☐ | ४. दूरदर्शन ☐ |
| ५. मासिके ☐ | ६. रेडिओ ☐ |
| ७. इतर ☐ | |

प्र. २ पुढील गोष्टींवर आपला विश्वास आहे का?

सूचना उत्तर होय असल्यास होय पुढील कंसात खूण करा व नाही असल्यास नाही पुढील कंसात खूण करा.

| | होय | नाही | अनिश्चित |
|---|---|---|---|
| १. अंगात येणे भूत | ☐ | ☐ | ☐ |
| २. अंगात येणे देव | ☐ | ☐ | ☐ |
| ३. नवस | ☐ | ☐ | ☐ |

ज्या कारणासाठी जाता त्यापुढील कंसात खूण करा. कारण असल्यास ते कारण लिहा.

होय असल्यास कारणे -

१. आजार बरा करण्यासाठी ☐

२. मुल व्हावे म्हणून ☐

३. वस्तु शोधण्यासाठी ☐

४. अन्य ☐

| | | | |
|---|---|---|---|
| ४. ज्योतिष / भविष्य | ☐ | ☐ | ☐ |
| ५. शुभाशुभ संख्या | ☐ | ☐ | ☐ |
| ६. वटसावित्री | ☐ | ☐ | ☐ |

७. शकुनाचा खडा ☐ ☐ ☐

८. श्राध्दविधी ☐ ☐ ☐

९. पत्रिका जुळविणे ☐ ☐ ☐

१०. भानामती ☐ ☐ ☐

११. करणी ☐ ☐ ☐

१२. सत्यनारायण ☐ ☐ ☐

होय असल्यास होय अशी खूण करा.

प्र. ३. बुवाबाजी / देवर्षी / मांत्रिक यावरील विश्वास - ☐

देवर्षीकडे जाता का? होय ☐ नाही ☐

कोणत्या कारणासाठी? ________________

१. आजार बरा करण्यासाठी ☐

२. हरवलेली गोष्ट शोधण्यासाठी ☐

३. भूत उतरविण्यासाठी ☐

४. विहीरीत पाणी मिळविण्यासाठी ☐

५. मूल होत नाही म्हणून ☐

६. भविष्य पाहण्यासाठी ☐

७. अन्य कारणे ☐

सूचना - मान्य असल्यास मान्य चौकोनात खूण करा. अमान्य असल्यास अमान्य चौकोनात खूण करा.

| प्र.४ आपणास मान्य की अमान्य सांगा. | मान्य | अमान्य |
|---|---|---|
| १. राम नामाचा जप पुण्यप्रद असतो. | ☐ | ☐ |
| २. नारायण नागबली विधीमुळे मुलगा होतो. | ☐ | ☐ |
| ३. गुरूमंडळी चमत्कार घडवू शकतात. | ☐ | ☐ |
| ४. माणसाच्या नशिबात जे काही असेल ते होणारच ते कोणीही बदलू शकत नाही. | ☐ | ☐ |

५. मंत्राने कावीळ, सर्पदंश इ. विकार बरे होतात. ☐ ☐

६. अंगारा लावल्यास रोगग्रस्त माणसास उतारा पडतो. ☐ ☐

७. रूद्राक्षमाळा घातल्याने आरोग्य सुधारते. ☐ ☐

८. नवग्रहाच्या अंगठ्या वापरल्यास संकटे टळतात. ☐ ☐

९. मंत्र जप वा यज्ञ केल्याने ग्रह शांत होतात. ☐ ☐

१०. ठराविक दिवशी ठराविक देवाचे दर्शन घेणे ☐ ☐

चांगले असते.

११. यज्ञ अग्निहोमामुळे दूषित वातावरण शुध्द होते. ☐ ☐

१२. काही देव/पीर/चर्चेस नवसाला जास्त पावतात. ☐ ☐

१३. मासिक पाळीच्या काळात शिवाशीव मानता का? ☐ ☐

देवाला जाणे / इतर कामे करणे गैर मानता का? ☐ ☐

१४. उपवास करता का?

१. आठवडयातून ☐ २. महिन्यातून ☐ ३. वर्षातून ☐

१५. वरील सर्व गोष्टीविषयी आपले मत काय?

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

# परिशिष्ट - इ

## आरोग्य

वैयक्तिक माहिती -

संपूर्ण नाव -------------------------------- वय -----------

व्यवसाय ----------------- शिक्षण ----------------

सूचना - उत्तर होय असल्यास होय चौकोनात ☐ खूण करा. नाही असल्यास नाही पुढील चौकोनात खूण करा.

आरोग्याची माहिती -

१. आजारपण आल्यास कोणता उपाय करता?

घरगुती उपचार ☐ देवर्षी ☐ डॉक्टर ☐ विश्रांती ☐

२. स्त्रियांना नेहमी होणाऱ्या आजाराबद्दल माहिती आहे का?

होय ☐ नाही ☐ फारशी नाही ☐

३. रोजचे जेवण व आरोग्य यांचा संबंध असतो असे वाटते का? होय ☐ नाही ☐

४. गरोदर असताना विशेष आहार घेतला होता का? होय ☐ नाही ☐

५. गरोदर असताना नियमित वैद्यकीय तपासणी केली होती का? होय ☐ नाही ☐

६. गरोदरपणात धनुर्वाताचे इंजेक्शन घेतले होते का? होय ☐ नाही. ☐

७. बाळंतपण कोठे केले ? दवाखाना ☐ घर ☐

८. बालसंगोपन माहिती घेतली का? होय ☐ नाही ☐

९. बाळाला ट्रिपल ☐ पोलिओ ☐ बी.सी.जी. ☐ डोस दिले का?

नाही नाही नाही नाही

१०. मुलांची नखे कापता का? होय ☐ नाही ☐

११.मुलांना स्वच्छतेच्या सवयी लावता का? होय ☐ नाही ☐

१२. घराजवळ संडास आहे का? होय ☐ नाही ☐

१३. स्वतंत्र स्नानगृहाची सोय आहे का? होय ☐ नाही ☐

१४. सांडपाण्याची व्यवस्था आहे का? होय ☐ नाही ☐

१५. एड्स बाबत माहिती आहे का? होय ☐ नाही ☐

१६. आपण केव्हा जेवता? सर्वांच्या आधी ☐ सर्वांबरोबर ☐ शेवटी ☐

१७. शेवटी जेवत असल्यास जेवण अपुरे वाटत का? होय ☐ नाही ☐

१८. मासिक पाळीच्या स्वच्छतेसंबंधी माहिती आहे का? होय ☐ नाही ☐

१९. या काळात काय करता? नेहमीचे काम ☐ विश्रांती ☐

आरोग्यसंबंधी कोणती माहिती आवश्यक वाटते ?

विविध रोगांची ☐ उपचारांची ☐ औषधांची ☐ रोग होउच नये ☐

यादृष्टीने कोणती काळजी घ्यावी याची माहिती आहे ☐ नाही ☐

## परिशिष्ट - फ

### आर्थिक प्रश्न पाहणी

व्यक्तीचे नाव -------------------------------- शैक्षणिक पात्रता ---------

व्यवसाय ------------------------------

१. आर्थिक अडचणी जाणवतात का? होय ☐ नाही ☐

२. पैसे कोठून घेता? सावकार ☐ मैत्रिणी/शेजारी ☐ बँका ☐ सोसायटी ☐

पतसंस्था नातेवाईक ☐

३. कर्ज गरजेनुसार सुलभपणे मिळते का? होय ☐ नाही ☐

४. भिशी चालते का? होय ☐ नाही ☐

भिशी हप्ता रक्कम किती?

रक्कम कशी वाटते ?

पैशाचा विनियोग कसा करता?

१. आजार ☐ समारंभ ☐ पाहुणे मंडळी खर्च ☐

गृहोपयोगी वस्तू ☐ जुने कर्ज फेडण्यासाठी ☐

५. बचत गटाची माहिती आहे का? होय ☐ नाही ☐

६. बचत गट असावा असे वाटते का होय ☐ नाही ☐

७. मदत देणाऱ्या शासकीय योजनांची माहिती आहे का?

८. दारिद्रयरेषेखाली असलेल्यांसाठी बचत गटाची माहिती / योजनांची आहे. का ?

होय ☐ नाही ☐

९. बचत गट केल्यास त्यात सामील व्हायला आवडेल का होय ☐ नाही ☐

१०. दर महिन्याला किती पैसे देवू शकाल किमान ☐ कमाल ☐

११. कर्ज मिळाल्यास त्याचा उपयोग कशासाठी करण्याची इच्छा आहे .

१२. स्वत:चा व्यवसाय करण्याची इच्छा आहे का होय ☐ नाही ☐

१३. त्यासाठी आपणास कोणती मदत हवी. कर्ज ☐ प्रशिक्षण ☐ मार्गदर्शन ☐

## परिशिष्ट - उ

## अंधश्रध्देवरील प्रयोग व विश्लेषण - कार्यक्रम

**प्रयोगातील घटक यादी**

१. मंत्राने अग्नि पेटविणे - बुक्का, पोटॅशियम परमॅगनेट व ग्लिसरीनचा उपयोग करून अग्नि पेटवून दाखविणे- ग्लिसरीनचे वर्णन - तूप म्हणून करणे, हळद कुंकू व लाकडाचा भुसा वापरून काडेपेटी शिवाय अग्नि पेटवून चमत्कार करून दाखविणे.

२. जळता कापूर खाणे - ३ सेकंदापर्यंत संवेदना पोहचत नाही व ऑक्सीजन मिळत नाही म्हणून कापूर विझतो.


३. नारळातून करणी काढणे - नारळाच्या डोळ्यातून आधीच चिंध्या, बांगड्या, फुले टाकून ते छिद्र बंद केले जाते. नारळच्या शेंडीच्या आत दडविले जाते व नारळ फोडून त्यातून वरील गोष्टी काढल्यास करणी केली आहे असे भासविता येते. प्रयोगानंतर त्याचे विश्लेषण.

४. गोडबाबा - सॅकरीन अगोदरच हाताला लावणे व प्रेक्षकातील एखादयाला तयार करून ठेवणे. साखरेपेक्षा दहापट अधिक गोडी त्यामुळे भाऱ्या वस्तूला हात लावतो तिला गोडपणा लागतो. प्रयोगात वस्तू पेन, दुसऱ्याचे हात गोड करून दाखविणे व नंतर सॅकरीनचे विश्लेषण.

५. विस्तवावरून चालणे - एक लांबट खोल नसलेला खड्डा खणून त्यात जळते निखारे ठेवणे व त्यावरून चालणे. यात तीन सेकंदाच्या आत चालत गेल्यास संवेदना पोचत नाहीत व पाय भाजत नाहीत हे नंतर स्पष्ट करणे.

परिशिष्ट - ए

## बचत गट म्हणजे परिवर्तन केंद्र




चैतन्य, राजगुरूनगर, स्वावलंबन बचत गट मार्गदर्शिका पृ. क्र. २३

महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघटना

## परिशिष्ट - ऐ

कार्यक्रमाची कार्यवाही करताना ज्या विविध संस्थाकडून चित्रफिती, तक्ते, प्रदर्शने इ. साधने उपलब्ध झाली. तसेच व्याख्याने व चर्चेसाठी तज्ज्ञ व्यक्तींचे सहकार्य मिळाले अशा संस्थांची यादी.

१. इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ एज्यूकेशन, पुणे

२. नवनिर्माण न्यास संचलित बचत गट संचालिका, पुणे

३. आशा केंद्र, पुणतांबा, जि. अहमदनगर

४. कॅन्सर सोसायटी, श्रीरामपूर

५. श्रीरामपूर मेडिकल असोसिएशन, श्रीरामपूर

६. आधार गट श्रीरामपूर

७. परिवर्तन मंच, श्रीरामपूर

८. अंधश्रध्दा निर्मूलन समिती, श्रीरामपूर.